माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.३७१५ / २२ /अ.क्र.८८०७ /२५**

श्रीम.संगीता नरोटे

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव (नवि-२३)
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (नवि-२३)
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२२ | ३१.०५.२०२२ | २०.०६.२०२२ | १३.०७.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी आज अपिलार्थी सुनावणीस हजर नाहीत. तथापि, तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.३१.०५.२०२२ रोजीच अपिलार्थींना त्यांच्या मूळ जोडपत्र अ मधील नमूद मुद्दा क्र.१ व २ च्या अनुषंगाने कार्यासनातील अभिलेखातील उपलब्ध असलेल्या नस्त्यांमधील १४१४ पृष्ठांसाठी एकूण रु.२८२८/- शुल्क व टपाल खर्चाची अंदाजित रक्कम रु.५०/- अशी एकूण रु.२८७८/- चा भरणा करण्याविषयी अपिलार्थींना सूचित केले होते. तथापि, अपिलार्थींनी उपरोक्त शुल्क न भरता विनामूल्य माहिती प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले असून वरील मागणी ही अपिलीय अधिकाऱ्यांच्या स्तरावरच फेटाळण्यात आली असून सशुल्क माहिती प्राप्त करण्याविषयी अपिलार्थींना सूचित करण्यात आले.

या संदर्भात दि.०८.०७.२०२२ रोजी मुद्दा क्र.३ संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या **गिरीष रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयुक्त व इतर** या संदर्भात रिट पिटीशन क्र.२७७३४/२०१२ यात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०३.१०.२०१२ रोजीच्या निर्णयाचा हवाला देत मागणी नाकारण्यात आली आहे.

या विरुध्द अपिलार्थींनी प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज दाखल केला असून वरील प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे स्तरावरुन देण्यात आलेला प्रतिसाद, पारित केलेला आदेश तसेच **मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या गिरीष रामचंद्र देशपांडे** प्रकरणातील दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता

झालेली कार्यवाही ही माहिती अधिकार अधिनियमांशी सुसंगत असून **मा.सर्वोच्च न्यायालय यांनी** दिलेल्या निर्देशाप्रमाणे असल्याचे प्रथम दर्शनी स्पष्ट होते. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज गुणवत्ताहीन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**